# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☏ : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in  संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac  www.sus.ac.in  विस्तारीत क्रमांक : १३०




**परीक्षा व मूल्यमापन मंडळ • Board of Examinations and Evaluation**

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/  दिनांक :
Ref. No. : PAHSU/BOEE/  Date :

**वाचा :** विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २७/२०२१, दिनांक ०६/०४/२०२१.

### सुधारीत परिपत्रक क्र.40/२०२१

प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य/प्राचार्या यांना संदर्भिय परिपत्रकान्वये परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दिनांक २५/०३/२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले होते. दिनांक २५/०३/२०२१ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव क्र. ०८ पारीत झालेला आहे.

**"कोविड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमास शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ई) पूर्ण करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे व या पुढे अशी मुदत वाढ देण्यात येणार नाही असे ठरले."**

उक्त ठरावास अनुसरुन, आपल्या महाविद्यालयामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये एम.ई. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे आणि सदरील अभ्यासक्रमातील सत्र I, II व III ची परीक्षा उत्तीर्ण झालले आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून एम.ई. सत्र IV चा शोधनिबंध विहित शुल्कासह विद्यापीठाकडे सादर करण्यास एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येत असल्याचे दिनांक ०६/०४/२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले होते. तथापि, संबंधित काही विविध घटकांकडून एक वर्षाची मुदतवाढ म्हणजे नेमकी किती तारखेपर्यंत मुदतवाढ याबाबत वारंवार विभागाकडे विचारणा होत आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये एम.ई. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे आणि सदरील अभ्यासक्रमातील सत्र I, II व III ची परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून एम.ई. सत्र - IV चा शोधनिबंध विहित शुल्कासह विद्यापीठाकडे सादर करण्यास दिनांक ३१/०७/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. यामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी. तसेच सदरील परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील सूचनाफलकावर लावण्याची व संबंधित विद्यार्थ्यांना अवगत करण्याची योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन व्हावी.

(डॉ. वि. ल. कदम)
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.पुअहोसोविसो/पवमूवि/एम.ई/२०२१/772
दिनांक : 9 JUL 2021
प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या, सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.